औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या गुरुवार दिनांक २४.११.८८ रोजी झालेल्या ३२ व्या सभेचा इतिवृत्तांत.

--x--

सभेस खालील पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वर भोसीकर | सभापती/औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. अ. म. महाजन | उपसभापती/औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. गोविंद स्वरूप<br>विभागीय आयुक्त | सभासद |
| ४] श्री. गोडघाटे<br>उपसंचालक नगररचना आणि<br>मुल्यनिर्धारण विभाग | -"- |

५] औरंगाबाद महानगरपालिका आयुक्त हे पूर्वसुचनेनुसार अनुपस्थित होते. महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री. धारुरकर हे त्यांचे प्रतिनिधी म्हणून सभेला उपस्थित होते. ह्याशिवाय श्री. प्रभाकर पुराणीक विभागीय माहिती अधिकारी निमंत्रणावरून उपस्थित होते.

सभेला सुरुवात करण्यापुर्वी नवनियुक्त सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत आले. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाच्या कार्यक्षेत्राच्या स्वरूपाची आणि मंडळाच्या सध्याच्या कार्यक्रमाबाबत माहिती करून घेतली. मंडळाने ज्या ज्या ठिकाणी जमिन संपादनाखाली टाकलेली आहे. अशा सर्व प्रकरणाची एक सविस्तर टिप्पणी दिल्यास पाठपुरावा करता येईल असे त्यांनी सुचविले. तसेच घरबांधणीचा कार्यक्रम वाढविण्याकरिता जिल्हा परिषदा, महानगर पालिका, नगर परिषदा यांच्याकडे जमिनी असल्यास त्यांचा सहभाग करून घ्यावा अशी सूचना केली. उपसंचालक, नगररचना यांनी मंडळाचे अधिकार व माहिती करून घेतली व अशी सूचना केली की, सभेची विषयसूची व टिप्पण्या सभासदांना सभेच्या अगोदर मिळाल्यास सभासदांना अभ्यास करून सभेला उपस्थित राहता येईल. यानंतर सभेला सुरूवात करण्यांत आली.

विषय क्र. १: मंडळाच्या कार्यक्षेत्रातील गृहनिर्माण योजना, गलिच्छवस्ती सुधारणा आणि जमिन संपादन इत्यादी कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा व नविन कार्यक्रम.

ठराव क्र. १२५

मंडळाने गृहनिर्माण योजना, गलिच्छवस्ती, सुधारणा, जमिन संपादन या कार्यक्रमाच्या प्रगतीच्या आढाव्याची नोंद घेतली.

विषय क्र. २:- वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्रमाची सारेखा ठरविणे.

ठराव क्र. १२६ :- या विषयावर चर्चा करतांना मंडळाने शासनाची प्राधिकरणाची भूमिका समजावून घेतली व असे मत प्रदर्शित केले की, वाळूज विशे नियोजन प्राधिकरणाच्या संपूर्ण अधिसुचीत जमिनीचा [११००० हे. जमिनीचा] रचनात्मक आराखडा तयार करण्याकरिता ३१.८.८९ पर्यन्त दिलेला कालावधी किमान दोन महिन्यानी कमी करण्याचा प्रयत्न करण्यांत यावा. याकरिता आवश ते सहाय्य खाजगी तंत्रज्ञाकडून जसे सर्वेक्षण, नकाशे, मोजमाप इत्यादी करून घ्यावे असे ठरले. तसेच मंडळाला २०० हेक्टर जमिन संपादन करण्याकरिता प्राधिकरणाने

<u>जळगांव</u>

जळगांव न.प.कडून हरिविठ्ठल व समतानगर या गलिच्छवस्त्यांचे अनुक्रमे ९.९६ लक्ष रु व ११.१९ लक्ष रु. च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता न.प.ने स्वत:च्या निधीतून खर्च करण्याच्या व नंतर जिल्हा नियोजन आणि विकास परिषदेने केलेल्या तरतुदीच्या उपलब्धतेनुसार ह्या खर्चाची परिपुर्तीकरुन घेण्याच्या अटीवर सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

<u>नासिक</u>

नासिक महानगरपालिकेकडून नाग चौक व एरंडवाडी या गलिच्छवस्तीस अनुक्रमे ०.४३ लक्ष रु व १.६० लक्ष रु. च्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मनपाने वरील गलिच्छवस्त्या ज्या राजपत्रात घोषित झाल्या त्या राजपत्राची प्रत सादर करण्याच्या अटीवर सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

सध्याचे दरडोई रु. २५० या प्रमाणात उपलब्ध होणारे अनुदान गलिच्छवस्तीतील सुधारणा कामे करण्यास अपुरे पडतात असे औरंगाबाद महानगरपालिकेने मंडळाच्या निदर्शनास आणले. त्यावर मंडळाने असे ठरविले की, आजच्या घटकेला सुविधा पुरविण्याचे विश्लेषण महानगरपालिका औरंगाबादकडून आल्यानंतर त्याप्रमाणे दरडोईल अनुदान वाढविण्याकरिता प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवावा.

<u>विषय क्र. ५:-</u>

एमआयडीसीकडून ताब्यात घेतलेल्या मंडळाच्या जमिनीवर १७६ अल्प उत्पन्न गटान्तर्गत योजनेच्या बांधकामाच्या निविदांची स्वीकृतीबाबत निर्णय घेणे.

<u>ठराव क्र. १२९</u>

जळगांव येथील एमआयडीसीकडून घेतलेल्या ५ एकर जमिनीवर १७६ अल्प उत्पन्न गटान्तर्गत गाळयांच्या बांधकामाकरिता प्राप्त झालेल्या निविदेवर निविदासमितीने दिलेल्या शिफारशीनुसार सुधारीत दराची म्हणजे इस्टीमेटरेटवर एक टक्का अधिक असलेली निविदा सर्वानुमते मंजूर करण्यांत आली.

मंडळाने तयार केलेल्या अभिन्यासास एमआयडीसी मंजूरी देत नसल्याने सुधारीत अभिन्यास व इमारत नकाशा [तळमजला+-दोन मजले असा ] तयार करुन एमआयडीसीकडून मंजूरी प्राप्त करुन घ्यावे. मंडळाने मात्र बांधकाम बैठया गाळयाचे करावे व पहिल्या व दुस-या मजल्याचे बांधकाम भविष्यात गाळेधारकांना करण्यास मुभा असावी. अभिन्यास मंजूरीच्या संदर्भात चर्चा करतांना उपसंचालक, नगररचना यांनी असे सुचविले की, जळगांव येथील न.प. ची हद्द वाढली असल्याने एमआयडीसीचा भाग देखील आता समाविष्ट असल्याचे कळते. त्यामुळे न.प. जळगांव कडून १७६ गाळयांच्या अभिन्यासास मंजूरी मिळत असल्यास घ्यावी. उपसभापतींनी चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करता येईल असे सांगितले.

विषय क्र. ६
-------- भुसावळ येथील सर्व्हे क्र. १२२/२ मधील जमिनीच्या ताबडीच्या मोजणी करिता रु. १००/- भरण्याची संमती प्रदान करणे.

ठराव क्र. १३०

भुसावळ येथील १२२/२ मधील मंडळाच्या ताब्यात असलेल्या जमिनीची मोजणी करुन घेण्याकरिता मंडळाने १०० रु. जिल्हा निरीक्षक व भूमि अभिलेख जळगांव यांच्याकडे भरण्यास सर्वानुमते मान्यता दिली.

मा. सभापतीच्या संमतीने आलेले विषय

विषय क्र. १: मंडळाच्या एकनाथनगर येथील जुन्या वसाहतीमध्ये रस्ते, गटारे, पाण्याचे नळ इत्यादी सुविधा महानगरपालिका औरंगाबादकडे पुढील देखभालीसाठी हस्तांतरीत करण्याबाबत चर्चा करण्यांत आली.

ठराव क्र. १३१

औरंगाबाद महानगरपालिकेने या सुविधा हस्तांतरीत करुन घेण्याकरिता मंडळाला पाणीपुरवठ्याची लाईन्सकरिता रु. १,८६,०००/- व गटारे करिता रु. ९८,०००/- भरावयास सांगितले असे उपसभापतींनी सांगितले यावर असे ठरले की, मंडळाने सर्व गाळेधारकांकडून रक्कम विभागून ही रक्कम भरण्यास सांगावे तसेच याबाबत प्राधिकरणास एक पत्र लिहून काही मदत करता येईल काय अशी विचारणा करावी.

विषय क्र. २: मा. सभापती यांनी एकनाथनगर वसाहतीतील कम्युनिटी हॉल साठी असलेली जागा गाळेधारकांच्या रहिवाशी संघटनेस वाजवी किंमतीत द्यावे असे मंडळाच्या सभेत मांडले.

ठराव क्र. १३२

एकनाथनगर येथील मंडळाच्या वसाहतीत कम्युनिटी हॉलसाठी असे राखीव जागा गाळेधारकांच्या रहिवाशी संघटनेस हस्तांतरीत करावी त्याकरिता मंडळाने यापूर्वी रु. ३०,००० भरावयास सांगितलेली रक्कम जास्त होते असे गाळेधारकांच्या रहिवाशी संघटनेच्या कार्यध्यक्षांनी सांगितले तेंव्हा ही रक्कम कशी काढली ते फेरतपासून पहावे म्हणजे गाळेधारकांच्या सहकारी संस्थेस अंतिम किंमत कळवता येईल.

विषय क्र. ३: मा. सभापतीच्या संमतीने बिल्डींग सेंटरबाबत.

ठराव क्र. १३३

केंद्र शासनाने महाराष्ट्रामध्ये इमारत केंद्र उभारण्याचे सांगितले आहे. अशा प्रकारचे केंद्र औरंगाबाद मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये उभारावे असे मा. सभापतींनी सुचविले याकरिता साधारणपणे तीन एकर जमिनीची आवश्यकता प्रत्येक ठिकाणी भासेल. शासकीय जमिनी औरंगाबाद, नांदेड, नासिक वगैरे ठिकाणी उपलब्ध होऊ शकेल काय याबाबत विचारणा करावी असे ठरले.

मा. सभापतींनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.